## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- ३३७९/२०२२

**अपिलार्थी, श्रीम. श्रध्दा विनायक परब,**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६ अे, प्लॉट क्र.२७/२८,
सेंट लॅरेन्स हायस्कूल समोर, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधिक्षक,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६ अे, वाशी,
नवी मुंबई ४०० ७०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विभागीय सहसचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६ अे, वाशी,
नवी मुंबई ४०० ७०३.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १९.०१.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०५.०८.२०२२ | -- | २९.०८.२०२२ | १९.१०.२०२२ |

अपिलार्थी यांनी दि. २१.११.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती अप्राप्त "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १९.०१.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्रीम.ज्योत्स्ना शिंदे-पवार, विभागीय सचिव तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.हेमलता बच्छाव, वरिठ अधिक्षक, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, वाशी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" दि.२२.०९.२०२० ते दि.२५.०९.२०२० रोजी झालेल्या चौकशीच्या अनुषंगाने त्रिसदस्यीय चौकशी समितीने वरिष्ठ कार्यालयास सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या अनुष्ंगाने केलेल्या कार्यवाही/कारवाईच्या माहितीबाबत सर्व माझे लेखी म्हणणे व पुरावा कागदपत्रे व सहकागदपत्रे तसेच सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत. क.रा.म./आस्थापना ६/५०३८ पुणे-४११ ००४ दिनांक ०७ डिसेंबर, २०२० च्या गोपनीय/कालमर्यादेत/तातडीच्या पत्राच्या अनुषंगाने.*

*१) भ्रष्टाचार, अनियमितता व लैंगिक शोषणास विरोध केल्याच्या रोषोने मंडळ कार्यालयात कार्यालयीन वेळेत, कार्यालयीन आवारात, कार्यालयात वेळेत मला वाळीत टाकून माझ्यावर बहिष्कार टाकल्याच्या अनुषंगाने संघटनांच्या माध्यमातून ६१ कर्मचारी यांचा एकत्र अनधिकृत जमा जमवून मा.श्री.ब्रम्हपुरकर दिलीप व अन्य यांचे विरुध्द पोलीस अधिक्षक यांचेकडे तक्रार नोंदविली म्हणून वाळीत टाकण्यासंदर्भात सभा घेतली संबंधितांनी कायदेभंग करुन दखलपात्र गुन्हा केलेला असूनही संबंधितांवर कायद्याच्या चौकटीत अधिन राहून पुढील कोणती कारवाई करण्यात आली याबाबतची प्राप्त लेखी म्हणणे व पुरावा कागदपत्रे व सहकागदपत्रे तसेच सिसिटिव्ही कॅमेरा फुटेज कृपया उपलब्ध करुन देण्यात यावी.*

*२) मी केलेल्या तक्रार अर्जानुसार फेब्रुवारी/मार्च-२०१९ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसंदर्भा खाजगी विद्यार्थ्यांसंदर्भात डमी नाव नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक नमूद करुन परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर केल्याबाबत त्रिसदस्यीय चौकशी समितीच्या अहवालानुसार सदर प्रकरणी तथ्य असल्याची बाब स्पष्ट झाल्याबाबत मुंबई विभागीय मंडळ स्तरावर चौकशी समितीने नमूद केलेल्या २२ प्रकरणातील अनियमिततेस*

*जबाबदार घटकावर कलल्या कारवाई तसेच अन्य तत्सम प्रणांची त्वरित प्राथमिक चौकशी करुन सदर चौकशी अहवालाच्या आधारे जबाबदार घटकांची निश्चिती करावी व चौकशीनुसार संबंधितांवर कारवाई केल्याच्या अनुषंगाने याबाबतची प्राप्त लेखी म्हणणे व पुरावा कागदपत्रे व सहकागदपत्रे तसेच सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत."*

सदर प्रकरणीतील अपिलार्थी यांनी निवेदन केले की, त्यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे माहिती प्राप्त झालेली नाही. यासंदर्भात खुलासा करताना प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी असे निवेदन केले की, यासंदर्भात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी त्यावेळी पुरविण्यात आलेली होती. तथापि अधिकची माहिती उपलब्ध असल्यास ती त्यांना देण्यात येईल. त्याचप्रमाणे सी.सी.टी.व्ही फुटेज हे उपलब्ध नसलेबाबत भांडार शाखेने कळविल्याप्रमाणे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधिक्षक, भांडार शाखा,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्याकडे अधिकची माहिती उपलब्ध असल्यास विनामुल्य पुरविणे योग्य होईल. तसेच पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधीक्षक, भांडार शाखा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण मंडळ, मुंबई विभाग यांनी सी.सी.टी.व्ही.फुटेज का पुरविले नाहीत किंवा का उपलब्ध नाहीत. याबाबतचा खुलासा सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधिक्षक, भांडार शाखा,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्याकडे अधिकची माहिती उपलब्ध असल्यास १५ दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी.**
२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधीक्षक, भांडार शाखा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण मंडळ, मुंबई विभाग यांनी सी.सी.टी.व्ही.फुटेज का पुरविले नाहीत किंवा का उपलब्ध नाहीत. याबाबतचा खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा.
३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१३.०४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १९ जानेवारी, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधिक्षक, भांडार शाखा,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६ अे, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

**- यांना प्रत**

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधिक्षक,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६ अे, वाशी,
नवी मुंबई ४०० ७०३.**यांचे मार्फत रवाना.**

## सुनावणी दिनांक ०४.०५.२०२६ ( In Continuation of order dt.१९.०१.२०२६)

## विवेचन

उपरोक्त दि.१९.०१.२०२६ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधीक्षक, भांडार शाखा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण मंडळ, मुंबई विभाग यांना सी.सी.टी.व्ही.फुटेज का पुरविले नाहीत किंवा का उपलब्ध नाहीत, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०४.०५.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी व प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी श्री.संजय मनोहर कापसे, वरीष्ठ अधीक्षक, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई, विभागीय मंडळ वाशी उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ अधीक्षक, भांडार शाखा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई, विभागीय मंडळ वाशी यांनी आयोगाकडे कोणताही अहवाल सादर केलेला नाही. त्यांच्या अहवालासाठी सदर प्रकरण पुढील दिनांकावर ठेवण्यात येत. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ अधीक्षक, भांडार शाखा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई, विभागीय मंडळ वाशी यांनी पुढील सुनावणीस उपस्थित राहून आयोगाच्या दि.१९.०१.२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचा अहवाल सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०५.०५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०४ मे, २०२६ .

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**